सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र. विविम/२०२१-२२/१२६

दिनांक : ३०/१२/२०२१

प्रति,

माननीय प्राचार्य/संचालक,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली

कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविणारी सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय- कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविण्यास विशेष बाब म्हणून मान्यता.**

महोदय / महोदया,

वरील विषयास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये जानेवारी, २०२२ ते फेब्रुवारी २०२२ अखेर या कालावधीत आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविण्यास **विशेष बाब** म्हणून मान्यता देण्यात येत आहे. योजना कालावधीत शासन व स्थानिक प्रशासनाने कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक उपायांच्या अनुषंगाने जमावबंदी, आंशिक अथवा पूर्ण टाळेबंदी अशा स्वरूपाचे आदेश जारी केल्यास ते आदेश या योजनेच्या अंमलबजावणी, कार्यान्वयनास तत्प्रभावाने लागू असतील व याबाबतीत या विभागाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी योजनेच्या प्रचलित सर्व नियम व अटींसह कोव्हिड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर खालील बाबींचे अनिवार्यतेने पालन अत्यावश्यक आहे.

१. शासन व स्थानिक प्रशासनाच्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक सर्व नियम व निर्बंधांच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी करावी.
२. शासन निर्देशानुसार संपूर्ण लसीकरण झालेले असल्याची खात्री करून घेऊनच इच्छुक विद्यार्थ्यांना या योजनेत समाविष्ट करावे.
३. या योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने स्थानिक प्रशासन, आरोग्य विभाग, संस्था प्रशासन, महाविद्यालय प्रशासन इत्यादी यंत्रणांकडून आवश्यकतेनुसार योग्य ती परवानगी प्राप्त करून घेण्यासंबंधी आपण आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.
४. विद्यार्थ्यांकडून कोविड अनुरूप वर्तन व समूहशिस्त यांचे काटेकोरपणे पालन सुनिश्चित करण्यासाठी आपल्या स्तरावर विद्यार्थी अथवा/ तसेच पालक यांची समूह सहभागासाठी संमती अथवा हमी आवश्यकतेनुसार प्राप्त करून घ्यावी.
५. कोविडच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची, संपूर्ण सुरक्षेची सर्वस्वी जबाबदारी ही सबंधित महाविद्यालय/ परिसंस्थेचीच आहे; याची नोंद घ्यावी.
६. कोविड अनुरूप वर्तन आणि कोविड प्रतिबंधात्मक नियम व निर्बंधांचे उल्लघंन झाल्यास संबंधित प्राधिकृत यंत्रणांकडून होणाऱ्या कायदेशीर प्रशासकीय/दंडात्मक इत्यादी स्वरूपाच्या संभाव्य कार्यवाहीस सबंधित महाविद्यालय/परिसंस्था संपूर्णपणे जबाबदार असून याबाबत विद्यापीठाचे कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/आर्थिक उत्तरदायित्व असणार नाही.
७. या योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या लसीकरणाची माहिती या विभागाच्या पत्र क्रमांक विविमं/२०२१-२२/०३४, दिनांक २८/१०/२०२१ नुसार भरणे अनिवार्य आहे. (संबंधित पत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थी विकास मंडळाच्या परिपत्रकात उपलब्ध आहे.)
८. शासन व स्थानिक प्रशासन यांच्याद्वारा वेळोवेळी जारी होणाऱ्या कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक आदेशाच्या अधीन राहूनच या योजनेची अंमलबजावणी, कार्यान्वयन, स्थगिती अथवा समाप्ती करणे बंधनकारक असून याबाबत महाविद्यालय/परिसंस्थेने आपल्या स्तरावर योग्य ते निर्णय घ्यावेत.

याचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. सदर योजना आपल्या महाविद्यालयात माहे जानेवारी २०२२ ते फेब्रुवारी २०२२ अखेर या दरम्यानच्या कालावधीतच राबविणे अनुज्ञेय आहे.

या योजनेच्या नियमावलीनुसार प्रत्येक महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये विद्यार्थी विकास मंडळाचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये माननीय प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे. या संयुक्त खात्यावर विद्यार्थी विकास मंडळाकडून मंजूर झालेल्या अन्य योजनेच्या अनुदानाचे वितरण व खर्च करणेही नियमाला धरून होईल. विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणाच्या नियमावलीत न राहता उपक्रमासंबंधी झालेल्या कार्यवाहीचा व वार्षिक लेख्यांचा वार्षिक लेखा परीक्षणाच्यावेळी विचार केला जाणार नाही. कळावे, हि विनंती.

आपला

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: Univ. 234
दिनांक: 5 JAN 2022
TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

26

Dr. BSM

विद्याविकास

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

स्वररंग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र.:विविमं/२०२२-२३/०२३

दिनांक : २९/०८/२०२२

प्रति,
माननीय प्राचार्य/संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय- शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविण्यास मान्यता.**
**संदर्भ - १. या विभागाचे विविमं/२०२१-२२/४४६, दिनांक १२/०७/२०२२.**
**२. या विभागाचे विविमं/२०२१-२२/४५१ , दिनांक २३ /०७/२०२२.**
**३. या विभागाचे विविमं/२०२१-२२/४७२ , दिनांक २९ /०७/२०२२.**

महोदय / महोदया,

वरील विषयास अनुसरून या विभागाच्या संदर्भीय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता कर्मवीर भाऊराव पाटील क्रमवा व शिका योजनेचे दिनांक १० ऑगस्ट, २०२२ पर्यंत विहित नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव विद्यार्थी विकास मंडळाच्या लिंकवर अपलोड करण्याबाबत कळविण्यात आले होते. (तांत्रिक अडचणी उद्भवलेल्या संबंधितांसाठी सदर लिंक दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ पर्यंत कार्यान्वित होती.)

त्यानुसार **दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ पर्यंत विहित पद्धतीने विद्यार्थी विकास मंडळाच्या लिंकवर ऑनलाईन पद्धतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचे प्रस्ताव अपलोड केलेल्या महाविद्यालय/परिसंस्थां यांनाच सदर योजना माहे फेब्रुवारी २०२३ अखेर पर्यंत राबविण्यास प्रस्तुत पत्राद्वारे मान्यता देण्यात येत आहे.**

दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ पर्यंत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचे ऑनलाईन पद्धतीने **प्रस्ताव अपलोड केलेल्या प्रत्येक** महाविद्यालय/**परिसंस्थाना पुढील कालावधीत** महाविद्यालय/परिसंस्थानिहाय **स्वतंत्रपणे या योजनेचे सविस्तर मान्यतापत्र** विद्यापीठ संकेतस्थळावर खालीलप्रमाणे *(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement– Menu– Download All Schemes approvals–* **योजना निवडा** *)* येथे उपलब्ध होईल. यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

योजना कालावधीत शासन व स्थानिक प्रशासनाने कोविड अनुरूप वर्तन व कोविड प्रतिबंधात्मक उपायांच्या अनुषंगाने जमावबंदी, आंशिक अथवा पूर्ण टाळेबंदी अशा स्वरूपाचे आदेश जारी केल्यास ते आदेश या योजनेच्या अंमलबजावणी, कार्यान्वयनास तत्प्रभावाने लागू असतील व याबाबतीत या विभागाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

**योजनेत सहभागी प्रत्येक व सर्व विद्यार्थ्यांना; त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कामाचा मोबदला (प्रति विद्यार्थी प्रति तास रुपये ४५/- याप्रमाणे एका दिवशी जास्तीत-जास्त ३ तासापर्यंतच) काम केलेल्या प्रत्येक महिन्यानंतर त्वरित संबंधित प्रत्येक / सर्व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्येच जमा करणे अनिवार्य आहे.** सदर योजना आपल्या महाविद्यालयात फेब्रुवारी २०२३ अखेर या दरम्यानच्या कालावधीतच राबविणे अनुज्ञेय आहे. **या योजनेच्या** नियमावलीनुसार प्रत्येक महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी विकास मंडळाचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये माननीय प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे. (या संयुक्त खात्याचा उपयोग फक्त विद्यार्थी विकास मंडळाकडूनच मंजूर झालेल्या या व इतर सर्व योजनांच्या अनुदानाचे वितरण व खर्च करणेसाठी करावा.)

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी योजनेच्या प्रचलित सर्व नियम व अटींचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणाच्या नियमावलीत न राहता उपक्रमासंबंधी झालेल्या कार्यवाहीचा व वार्षिक लेख्यांचा वार्षिक लेखा परीक्षणाच्यावेळी विचार केला जाणार नाही. कळावे, हि विनंती.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

आपला

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

Dr B J Mali
Tate

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: Univ 141
दिनांक: 1 SEP 2022


27

Anekant Education Society's

**Tuljaram Chaturchand College of Arts, Science and Commerce College, Baramati**

**Board of Student Development (Academic year 2022-23)**

**Photographs of Earn and learn working in adm. office**



EARN AND LEARN WORKING IN ADM. OFFICE

## कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना या शैक्षणिक वर्ष 2021-2022 :

महत्त्वपूर्ण योजनेअंतर्गत विद्यार्थी विद्यार्थिनींशी सोशल मीडिया व नोटीसद्वारे सहभागी होण्यावर आव्हान केले त्यानुसार 400 पेक्षा जादा अर्ज प्राप्त झाले होतकरू परंतु आर्थिक दुर्बल या निकषा आधारावरती 51 विद्यार्थी विद्यार्थिनींना फेब्रुवारी मार्च 2022 मध्ये कामावर शिकाविण्यात सहभागी करून घेतले व महाविद्यालयातील विविध विभागांमध्ये काम करण्याची संधी दिली या कर्तव्याचा मोबदला आठ हजार शंभर रुपये विद्यार्थी विद्यार्थिनींच्या वैयक्तिक बँक खात्यावरती ऑनलाईन जमा केले त्याचबरोबर एप्रिल व मे 2022 या दोन महिन्यांमध्ये कमवा व शिका योजना सुरू ठेवण्यात आली व अशाच पद्धतीने विद्यार्थी विद्यार्थिनींना योग्य तो मोबदला दिला जातो.

विद्यार्थी विकास अधिकारी
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
बारामती जि. पुणे

**कर्मवीर भाऊराव पाटील कमवा शिका योजना या शैक्षणिक वर्ष 2022 –23 :** या महत्त्वपूर्ण योजना अंतर्गत विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांशी सोशल मीडिया व्हाट्सअप ग्रुप नोटीस टेलिग्राम याद्वारे विविध अटीसह सहभागी होण्याबाबत आवाहन केले त्यानुसार साडेचारशे पेक्षा जादा अर्ज या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनी कडून प्राप्त झाले या योजनेअंतर्गत प्रशासन भवन क्रीडा विभाग कविवर्य मोरोपंत बोटॅनिकल गार्डन व इतर विभागाबरोबर ग्रंथालयामध्ये सुद्धा विद्यार्थ्यांना त्यांचे कर्तव्य बजावण्याची संधी प्राप्त करून दिली जाते या कामाचा यावर्षी मोबदला हा आठ लाख रुपये 132 विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या खात्यावरती ऑनलाईन जमा करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाने एकूण दोन लाखापेक्षा जास्त आपला वाटा उचललेला आहे या योजनेअंतर्गत एकूण 136 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व खऱ्या अर्थाने श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्यासंदर्भात या आणि या योजनेअंतर्गत काम केले जाते ही योजना सुव्यवस्थित राबवण्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य उपप्राचार्य रजिस्टर व शिक्षकेतर कर्मचारी यांचा खूपच मोठा सहभाग लाभतो या योजनेचा लाभ अनेक विद्यार्थी विद्यार्थिनींना शिक्षण घेत असताना जी आर्थिक चंचल भासते ती पूर्ण करण्यासाठी होतो व त्यामुळे त्यांचे शिक्षण घेणं सुखकारक व सोयीचं होऊन जातं

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

विद्यार्थी विकास अधिकारी
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय
बारामती, जि.पुणे ४१३१०२

# NIRBHYA KANYA WORKSHOP

23/03/2022 RESOURCE PERSON BHOITE MADAM

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI








...अधिकारी

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय